RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

# महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

■ वर्ष १ ■ अंक ३ ■ गुरुवार, २१ ते २८ मे २०२६ ■ किंमत ३ रुपये ■ पाने ४

## जेएमएफच्या जन गण मन विद्यालयाचा २०२५-२६ मध्ये पुन्हा 100% एसएससी निकाल




डोंबिवली ( प्रतिनिधी ) - जाह्नवीज मल्टी फाउंडेशनच्या जन गण मन विद्यामंदिर स्कूलने यंदाच्या एसएससी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा उल्लेखनीय १००% निकाल मिळवत शैक्षणिक उत्कृष्टतेची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. स्थापनेपासूनच शाळेने सातत्याने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा जपली असून, दजेर्दार शिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली संस्थेची बांधिलकी यामुळेच हा यशस्वी प्रवास शक्य झाला आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि शिस्तबद्ध अभ्यासाच्या जोरावर शाळेचे नाव उज्ज्वल केले. यावर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : निहार मोनल प्रवीण बागडे - ८९.४०%, आयुष मनीषा सुरज पांचाळ - ८८.८०%, नंदिनी रीना बसंत सिंग - ८७.८०%, या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना डॉ राजकुमार एम कोल्हे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभाशीर्वाद दिले. आत्मविश्वास, शिस्त आणि समर्पणाच्या बळावर जीवनात अधिक मोठी उद्दिष्टे गाठण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. डॉ प्रेरणा राजकुमार कोल्हे, संस्थेच्या सचिव, यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून शाळेच्या सातत्यपूर्ण यशाबद्दल आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व वैयक्तिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न शील राहावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले. शाळेच्या या यशामागे प्रभारी मुख्याध्यापक अलपेश खोब्रागडे आणि तेजावती कोटींयन यांचे मोलाचे नेतृत्व व मार्गदर्शन लाभले असल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले. तसेच शिक्षिका मंजुषा चौधरी, मीना वटकर, सीमा यादव, मृणाल विरकूड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. पालक, हितचिंतक आणि नागरिकांकडून शाळेच्या व्यवस्थापनाचे, शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या यशामुळे जन गण मन विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कटिबद्ध असलेल्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

### जाह्नवीज मल्टि फाऊंडेशन संचालित गण मन कनिष्ठ महाविद्यालयाच्या

## उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन....




डोंबिवली ( प्रतिनिधी ) - बारावीच्या परीक्षेचा निकाल लागताच मनावरचा कमी होणारा ताण आणि यश मिळाल्याचा आनंद होतो. जन गण मन कनिष्ठ महाविद्यालयाचा ९९.६८% नी निकाल लागला तर काही विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शास्त्र विभागातून लावण्य युवराज तळेले या विद्यार्थ्यार्ने ९२.१७% प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला तर अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक निशांत ओंकार पाटील ८४.८३%, तर वंश बिपीन ठक्कर ८२.८३% प्राप्त केले. वाणिज्य शाखेतून अनुक्रमे प्रीतम गौतम दुआ ८८.१७% , पीयुष उत्तम दुआ ८७.८३% तर पार्थ चोणकर ८४.८३% या विद्यार्थांनी आपले स्थान पक्के केले. कला शाखेमधून अनुक्रमे रणधीर सोनकर ७२.१७% , अवनीश पटवर्धन ७१.८३% तर तन्वी म्हात्रे ७१.८३% प्राप्त केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांनी सर्व उत्तीर्ण आणि उच्च श्रेणी मधून उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.शालेय जीवनापासून प्रत्येक टप्प्यावर आत्मविश्वासाने मात करत बारावीचा टप्पा देखील आपण सर्वांनी प्रयत्नाने आणि आत्मविश्वासाने पूर्ण केला, बारावीचा हा टप्पा आयुष्याला आणि भविष्याला कलाटणी देणारा टप्पा आहे, तुमचे भवितव्य तुमच्या हातात आहे , योग्य निर्णयाने भविष्याला आपल्या जवळ करा आणि यशाची शिखरे पादाक्रांत करा ,असा अमूल्य सल्ला संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना दिला ,तर स्वप्न केवळ बघून मोठी होत नसतात तर झटून मोठी होतात म्हणूनच यश मिळाले म्हणून इथेच न थांबता झटून कामाला लागा आणि स्वप्नांचा पाठपुरावा करा, असे संस्थापिका सचिव डॉ.प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले व सर्वांचे कौतुक केले. सर्व शिक्षकांनी घेतलेल्या कष्टाचे आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे फलस्वरूप म्हणजे आजच्या ज्युनिअर कॉलेजचा सर्वोत्तम निकाल. प्रभारी प्राचार्य श्री.अल्पेश खोब्रागडे सर आणि उपप्राचार्य श्री.एकनाथ चौधरी सर यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले.संपूर्ण विदयासमूहाकडून यशस्वी विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.

### जे एम एफ च्या जन गण मन कॉन्व्हेंट स्कूल, दावसा, नरखेड, नागपूर यांचा

## २०२५-२६ मध्ये पुन्हा 100% SSC निकालाचा मानाचा तुरा




नरखेड / नागपूर ( प्रतिनिधी ) - जाह्नवीज मल्टि फाऊंडेशन, अंतर्गत कार्यरत जन गण मन कॉन्व्हेंट स्कूल, दावसा यांनी यावर्षीच्या एस एस सी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेच्या स्थापनेपासूनच सातत्याने 100% निकालाची परंपरा कायम असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली संस्थेची बांधिलकी यातून स्पष्ट होते. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, समर्पण आणि शिस्तबद्ध तयारीच्या जोरावर संस्थेचे नाव उज्ज्वल केले. शाळेने यंदाच्या गुणवंत विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली असून त्यात पुढील विद्यार्थ्यांचा समावेश आहे : जयमाला लीलाधर हिंगवे - 87.20%, रिद्धी प्रगती अनिलराव ढोले - 87.20%, देवश्री भारती हरिभाऊ खुजे - 86.80%, करण संगीता होमेश्वर खवाशे - 85.40%, जान्हवी पूनम देवेंद्र दातीर - 84.80%, चैतन्य किरण गोविंदजी बोंडारे - 82.40%, रेहान शेख रिजवाना परवीन इर्शाद शेख - 78.40%, वैष्णवी प्रिती दीपकराव उमाळे - 75.40% या अभिमानास्पद यशाबद्दल डॉ राजकुमार एम कोल्हे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त आणि समर्पणाच्या जोरावर जीवनात आणखी उच्च ध्येय गाठावीत, असा आशीर्वाद त्यांनी दिला. तसेच डॉ प्रेरणा राजकुमार कोल्हे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून संस्थेच्या सातत्यपूर्ण यशाबद्दल आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच वैयक्तिक विकासातही उत्कृष्टतेचा ध्यास कायम ठेवावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. या यशामागे शाळेचे प्राचार्य भूपेंद्र भजन आणि व्यवस्थापक महेश कलंबे यांचे प्रभावी नेतृत्व व मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले असल्याचे संस्थेच्या व्यवस्थापनाने नमूद केले. तसेच शिक्षक अनिल भाले, जयश्री सातपुते, ज्योती कुटे, रंजना सुरजुसे आणि सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षभर विद्यार्थ्यांना दिलेल्या परिश्रमपूर्वक मार्गदर्शनाबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, हितचिंतक आणि परिसरातील नागरिकांनी शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे जन गण मन कॉन्व्हेंट स्कूल, दावसा, नरखेड, नागपूर ही ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी आणि विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला योग्य दिशा देणारी एक आशादायी शैक्षणिक संस्था म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## मुंबईची वाहतूक कोंडी फुटणार, खासगी बसला आता नो एन्ट्री, मास्टर प्लॅन काय?




मुंबई (प्रतिनिधी) - मुंबई शहरात दररोज होणारी वाहतूक कोंडी आणि वाहनांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि धाडसी पाऊल उचलले आहे. मुंबईत प्रवेश करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स आणि आंतरराज्य बसेसमुळे अंतर्गत रस्त्यांवर होणारी कोंडी फोडण्यासाठी पालिकेने १ हजार २३२ कोटी रुपयांचा सर्वसमावेशक आराखडा तयार केला आहे. या योजनेचा मुख्य भाग म्हणून मुंबईत येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स आता शहराच्या वेशीवरच रोखल्या जाणार आहेत. दहिसर येथील जुन्या जकात नाक्याच्या जागेवर एक भव्य वाहतूक आणि व्यावसायिक केंद्र उभारले जाणार आहे.

# संपादकीय

## आरटीई शिक्षण : गुण, दोष आणि प्रभावी अंमलबजावणीची गरज....

शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत आणि घटनात्मक हक्क आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम २१-अ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी राज्यावर टाकण्यात आली आहे. या घटनात्मक तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकारने २००९ मध्ये 'मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार कायदा' अर्थात आरटीई लागू केला. या कायद्याचा मुख्य उद्देश समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. विशेषतः खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा कायदा केवळ शिक्षणाचा अधिकार देत नाही, तर प्रत्येक मुलाला सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, याचीही हमी देतो. मात्र, कोणताही कायदा यशस्वी होण्यासाठी त्याची संतुलित, पारदर्शक आणि व्यावहारिक अंमलबजावणी आवश्यक असते. आरटीईने अनेक सकारात्मक बदल घडवून आणले असले तरी त्याच्या अंमलबजावणीत काही गंभीर त्रुटी आणि व्यावहारिक अडचणीही समोर येत आहेत. त्यामुळे आज गरज आहे ती आरटीईविषयी टोकाची भूमिका घेण्याची नव्हे, तर गरीब विद्यार्थ्यांचे हित आणि शाळांची शैक्षणिक व आर्थिक स्थिरता या दोन्ही गोष्टींचा समतोल राखण्याची. आरटीईचे सकारात्मक पैलू आरटीईमुळे लाखो गरीब आणि वंचित मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. पूर्वी आर्थिक परिस्थिती, सामाजिक मागासलेपणा किंवा जागरूकतेअभावी अनेक मुले शाळेबाहेर राहत होती. या कायद्यामुळे त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात शाळांमध्ये प्रवेशाचे प्रमाण वाढले आहे. या कायद्यामुळे शिक्षणातील सामाजिक समतेला चालना मिळाली. विविध आर्थिक आणि सामाजिक स्तरातील मुले एकाच शाळेत शिकू लागल्याने सामाजिक एकात्मता वाढण्यास मदत झाली. शिक्षण ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी नसून प्रत्येक मुलाचा अधिकार आहे, हा संदेश समाजात दृढ झाला. आरटीईमुळे शाळांमध्ये मूलभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, स्वच्छता, सुरक्षित परिसर, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे यांसारख्या बाबींवर अधिक भर देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळाला कायद्याने बंदी घालून बालकेंद्रित शिक्षणपद्धतीला प्रोत्साहन देण्यात आले. 'नो डिटेन्शन पॉलिसी'चा उद्देश विद्यार्थ्यांमधील भीती कमी करून शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे हा होता. शिक्षण हा दबावाचा नव्हे तर विकासाचा मार्ग आहे, ही भावना या धोरणातून अधोरेखित झाली. अंमलबजावणीतील व्यावहारिक आणि कायदेशीर अडचणी आरटीईचा हेतू अत्यंत उदात्त असला तरी त्याच्या अंमलबजावणीत अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत. सर्वप्रथम प्रवेश प्रक्रियेतील गुंतागुंत ही मोठी अडचण ठरत आहे. ज्या गरीब आणि अशिक्षित पालकांसाठी ही योजना आहे, त्यांनाच कागदपत्रे, ऑनलाइन प्रक्रिया आणि प्रशासकीय अटी पूर्ण करणे कठीण जाते. दुसरीकडे काही सधन व्यक्ती खोटे उत्पन्न दाखले, बनावट कागदपत्रे किंवा गैरमार्गांचा वापर करून आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवतात, अशा तक्रारी वारंवार समोर येतात. ही बाब केवळ कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासणारी नाही, तर खऱ्या गरजू विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. त्यामुळे शासनाने आरटीई प्रवेश प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, कडक पडताळणी आणि डिजिटल सत्यापन यंत्रणा निर्माण करणे अत्यावश्यक आहे. शाळांवरील आर्थिक आणि प्रशासकीय भार खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक आहे. परंतु अनेक वेळा शासनाकडून मिळणारे प्रतिपूर्ती अनुदान वर्षानुवर्षे प्रलंबित राहते किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असते. परिणामी अनेक शाळांवर गंभीर आर्थिक ताण निर्माण झालेआहे. विद्यार्थ्यां साठी शैक्षणिक साहित्य व त्यासाठी लागणारा निधी याची पूर्तता शासनाने करने गरजेचे आहे. शाळांना शिक्षकांचे वेतन, पायाभूत सुविधा, वीज, तंत्रज्ञान, सुरक्षा, प्रयोगशाळा आणि इतर शैक्षणिक खर्च नियमितपणे करावे लागतात. परंतु शासनाकडून निधी वेळेवर न मिळाल्यास शाळांची आर्थिक घडी विस्कळीत होते. याचा परिणाम अप्रत्यक्षपणे शिक्षणाच्या गुणवत्तेवर होण्याची शक्यता असते. कायद्याच्या दृष्टीने पाहता, कोणत्याही सामाजिक कल्याणकारी योजनेची संपूर्ण जबाबदारी केवळ खासगी संस्थांवर टाकणे न्याय्य ठरत नाही. राज्यघटनेनुसार शिक्षणाची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे शासनाने वेळेवर निधी देणे, प्रक्रिया सुलभ करणे आणि शाळांना सहकार्य करणे ही देखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. अल्पसंख्याक संस्थांचा प्रश्न आणि समतोलाची गरज आरटीई कायद्यात अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना काही प्रमाणात सवलती देण्यात आल्या आहेत. परिणामी अनेक राज्यांमध्ये काही विशिष्ट शाळांवर आरटीईचा अतिरिक्त भार पडत असल्याची भावना व्यक्त केली जाते. विशेषतः विनाअनुदानित इंग्रजी माध्यम शाळांना आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींचा अधिक सामना करावा लागत असल्याचे अनेक शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. ही परिस्थिती सामाजिक किंवा धार्मिक संघर्ष निर्माण करण्यासाठी नव्हे, तर धोरणात्मक पुनर्विचारासाठी गंभीरतेने अभ्यासण्याची गरज आहे.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

# 'कर्म हीच पूजा' - मूल्याधारित शिक्षण

'कर्म हीच पूजा' हा विचार आपल्या भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे - 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन', म्हणजेच काम करणे आपल्या हातात आहे, फळाची अपेक्षा करू नये. जे काम आपण मनापासून, प्रामाणिकपणे आणि समर्पणाने करतो, तीच खरी ईश्वरसेवा असते. प्रत्येक व्यक्तीचे काम वेगळे असते. शिक्षकासाठी शिकवणे, डॉक्टरांसाठी रुग्णसेवा, शेतकऱ्यासाठी शेती, सफाई कामगारासाठी स्वच्छता - ही सर्व कामे समाजासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. जेव्हा आपण आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतो, तेव्हा त्या कामातच देव दिसतो. म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणतात, 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.' कामाला पूजा मानल्याने जीवनात शिस्त येते. आळस, टाळाटाळ आणि नकारात्मकता दूर होते. कष्ट करणाऱ्या व्यक्तीला आत्मसंतोष मिळतो आणि समाजात मान-सन्मान मिळतो. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वतः चरखा चालवत, परिसर स्वच्छ करत. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रात्रंदिवस अभ्यास करून देशासाठी संविधान लिहिले - हे त्यांच्या कर्मयोगाचे उत्तम उदाहरण आहे. आजच्या तरुण पिढीने 'शॉर्टकट'च्या मागे न लागता, मेहनतीवर विश्वास ठेवला पाहिजे. अभ्यास असो वा व्यवसाय, जे काम हाती घेऊ ते पूर्ण निष्ठेने केले पाहिजे. कामात दिरंगाई करणे, लाच घेणे, फसवणूक करणे म्हणजे पूजेत विघ्न आणण्यासारखे आहे. थोडक्यात, जिथे प्रामाणिक कष्ट आहेत, तिथे यश आहे आणि तिथेच देव आहे. म्हणूनच मंदिरात जाऊन फुले वाहण्यापेक्षा, आपले काम चोखपणे करणे हीच खरी ईश्वरभक्ती. 'कर्म हीच पूजा' हा मंत्र जीवनात उतरवला, तर प्रत्येक दिवस उत्सव होईल आणि आपले राष्ट्र प्रगतीपथावर अग्रेसर राहील. मूल्याधारित शिक्षण - महत्त्वाचे मुद्दे मूल्याधारित शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या मनात चांगली मूल्ये, संस्कार आणि चारित्र्य रुजवणे. आजच्या स्पर्धेच्या युगात ही शिक्षणपद्धती अत्यंत आवश्यक झाली आहे. याविषयीचे काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणेः १. चारित्र्य घडवतेः मूल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, जबाबदारी आणि सहकार्याची भावना निर्माण होते. गुणांबरोबरच चांगला माणूस घडवणे हे या शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. २. संस्कृतीची जपणूकः आपली भारतीय संस्कृती, परंपरा, 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'सत्यमेव जयते' यांसारखी तत्वे मुलांना शिकवली जातात. त्यामुळे मुले आपल्या मुळांशी जोडलेली राहतात. ३. योग्य-अयोग्यची जाणीवः जीवनात येणाऱ्या प्रत्येक प्रसंगात काय योग्य आणि काय अयोग्य याचा निर्णय घेण्याची क्षमता मूल्याधारित शिक्षण देते. यामुळे मुले कोणत्याही दबावाखाली चुकीच्या मार्गाला जात नाहीत. ४. भावनिक व सामाजिक विकासः दया, करुणा, आदर, प्रेम, सहानुभूती यांसारखी मूल्ये मुलांमध्ये विकसित होतात. यामुळे ते कुटुंब, समाज आणि देशाचे जबाबदार नागरिक बनतात. 'दुसऱ्याला मदत करणे हाच खरा धर्म' ही भावना रुजते. ५. तणावमुक्त जीवनः आजच्या काळात मुले मार्कांच्या आणि करिअरच्या तणावाखाली असतात. मूल्याधारित शिक्षणातून मिळणारा संतोष, समाधान आणि सकारात्मक दृष्टिकोन त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम बनवतो. ६. सर्वांगीण विकासः केवळ बौद्धिक विकास न करता, शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक विकास साधला जातो. यामुळे विद्यार्थी जीवनातील प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्यास समर्थ होतो. ७. शांतीपूर्ण समाज निर्मितीः अहिंसा, सहिष्णुता, एकता आणि बंधुभाव ही मूल्ये मुलांमध्ये रुजल्यास भविष्यात एक शांतीपूर्ण आणि सुसंस्कृत समाज निर्माण होईल. थोडक्यात, मूल्याधारित शिक्षण म्हणजे जीवन जगण्याची कला शिकवणे. 'विद्या विनयेन शोभते' या उक्तीप्रमाणे ज्ञानाबरोबर विनय आणि संस्कार असतील, तरच ते खऱ्या अर्थाने शिक्षण ठरते. शाळा आणि पालकांनी एकत्र येऊन मुलांना हे संस्कार देणे ही काळाची गरज आहे.

तेजावती कोटियान
प्रभारी प्राचार्य, जन गण मन विद्यामंदिर व ब्रह्माकुमारीज शिक्षिका

# सीबीआयच्या अटकेत असलेल्या मनीषा मांढरे यांचे कॉलेजकडून निलंबन....



पुणे ( प्रतिनिधी ) - नीट पेपर फुटी प्रकरणात सीबीआयने अटक केलेल्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पुणे येथील प्राध्यापिका मनीषा मांढरे यांच्यावर कॉलेज प्रशासनाने निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. मॉडर्न कॉलेज प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सीबीआयच्या अटकेनंतर संस्थेच्या नियमांनुसार मांढरे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. त्यांना तात्पुरते निलंबित करण्यात येईल, असे कॉलेज सूत्रांनी सांगितले. प्रकरण काय आहे? नीट पेपर फुटी प्रकरणात सीबीआय ने दोन दिवसांपूर्वी मनीषा मांढरे यांना अटक केली होती. गेल्या अनेक वर्षांपासून पुण्यातील प्रतिष्ठित मॉडर्न कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या मांढरे यांच्यावर पेपर फुटीशी संबंधित आरोप आहेत. सीबीआयच्या तपासात त्यांचा सहभाग असल्याचे समोर आल्याने त्यांना अटक करण्यात आली. कॉलेज प्रशासनाने याबाबत गंभीर भूमिका घेतली असून, 'संस्थेची प्रतिष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही हलगर्जीपणा केला जाणार नाही,' असे वक्तव्य केले आहे. मनीषा मांढरे यांनी मॉडर्न कॉलेजमध्ये दीर्घकाळ सेवा बजावली आहे. नीट परीक्षेशी संबंधित कथित घोटाळ्यात त्यांचे नाव समोर आल्यानंतर संपूर्ण शैक्षणिक वतुर्ळात खळबळ उडाली आहे.सीबीआय सध्या या प्रकरणात आणखी काही संशयितांची चौकशी केली जात आहे. या प्रकरणामुळे नीट पेपर फुटी प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही या प्रकाराची तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. 1. नीट 2026 पेपरफुटी प्रकरण काय आहे? नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका आधीच काही ठिकाणी लीक झाल्याचा संशय असून त्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली आणि CBI तपास सुरू झाला. 2. प्रा. शिवराज मोटेगावकर कोण आहेत? ते लातूरमधील प्रसिद्ध RCC केमिस्ट्री क्लासेसचे संचालक असून ठएएळ तयारीसाठी ओळखले जातात. 3. फ्ठउ क्लासेसवर संशय का आहे? मॉक टेस्टमधील प्रश्न आणि मूळ NEET पेपरमधील प्रश्न जुळल्याने उइक ला गळतीचा संशय आला. 4. CBI ने कोणती कारवाई केली आहे? उइक ने चौकशी, छापे, डिजिटल उपकरणे जप्त करणे आणि संबंधितांची चौकशी सुरू केली आहे. 5. तपासात कोण-कोण सहभागी आहेत? विद्यार्थी, क्लास स्टाफ, काउन्सेलर्स आणि इतर संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू आहे. 6. NEET 2026 परीक्षा का रद्द झाली? पेपर लीकच्या गंभीर आरोपांमुळे परीक्षेची पारदर्शकता धोक्यात आल्याने ती रद्द करण्यात आली.

# निवडणूक कामासाठी गेलेल्या शिक्षकांना धक्का; मूळ ठिकाणी तातडीने रुजू होण्याचे निर्देश....



पुणे (प्रतिनिधी) - निवडणुकीबरोबरच विविध प्रकारच्या शासकीय कामासाठी प्रतिनियुक्ती झालेल्या शिक्षकांना आता त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी परत जावे लागणार आहे. कार्यमुक्त केल्याच्या आदेशानंतरही मूळ जागी रुजू न झाल्यास अशा शिक्षकांचे मे पासूनचे वेतन न देण्याच्या सूचना प्राथमिक शिक्षण विभाग आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने दिल्या आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत संयुक्त परिपत्रकाद्वारे विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना सूचना दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि खाजगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची निवडणूक आणि अन्य कामांसाठी प्रतिनियुक्ती केली आहे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकांबाबत क्षेत्रीय कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्यानंतर नऊ मे रोजी झालेल्या बैठकीत निवडणूक आणि अन्य कामावर प्रतिनियुक्त असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांचे मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तत्काळ कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी. सादर केलेल्या माहिती व्यतिरिक्त शिक्षकांची प्रतिनियुक्ती शासकीय कार्यालयात असल्यास त्या कार्यालय प्रमुखांशी संपर्क करून त्यांनाही कार्यमुक्त करण्याचे निर्देश द्यावेत, असे स्पष्ट केले आहे.

# नीट 2026 फेरपरीक्षेसाठी मिळणार अतिरिक्त वेळ, ॲडमिट कार्ड १४ जूनपर्यंत....

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी दिली माहिती




दिल्ली - नीट यूज २०२६ पेपरफुटीनंतर फेरपरीक्षा घेतली जाणार आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा रद्द केलं होतं. आता एनटीएकडून फेरपरीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली आहे. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांसह पालकातून संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेत पेपरफुटी प्रकरणातील दोषी पाताळात जरी लपले तरी त्यांना शोधून काढू असं म्हणत कठोर कारवाई करणार असल्याचं सांगितलं.

एनटीएनं सोशल मीडियावर फेरपरीक्षेची नवी तारीख आधीच जाहीर केलीय. २१ जून रोजी नीटची फेरपरीक्षा होणार आहे.हॉलतिकिट ते परीक्षा केंद्राची माहिती एनटीएकडून दिली जाणार आहे. गेस पेपर लीक झाल्यानंतर तीन ते चार दिवसांनी नीट परीक्षा रद्द केली गेली.या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं की, विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी आम्ही परीक्षेची नवी तारीख आजच जाहीर केलीय. एक महिन्यात नव्याने परीक्षा घेतली जाईल. परीक्षा माफियांसोबत आमची लढाई आहे.

वेगवेगळ्या सोशल मीडियावरून दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात आहे. अफवांपासून दूर राहणं गरजेचं आहे. सध्या पेपरफुटीच्या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. सीबीआय याचा सखोल तपास करणार आहे. तपास यंत्रणेकडून याकडे गांभीयार्ने पाहिलं जात आहे. माफियांनी आता परीक्षेपासून दूर रहावं अन्यथा शिक्षा होईल असा इशाराही धर्मेंद्र प्रधान यांनी दिला.पेपरफुटीच्या घटनेमुळे आम्ही दुःखी आहोत. मात्र आम्हाला मोठ्या उद्देशामुळे पेपर रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला. कुणावर अन्याय होऊ नये म्हणून हा निर्णय घेतला. आम्हाला अनेक सूचना मिळाल्या आहेत. एनटीएमध्ये झिरो एरर ही आमची जबाबदारी आहे आणि ते आम्ही करू. विद्यार्थ्यांवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही याची जबाबदारी आम्ही घेतो असंही धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं.

नीट यूजी २०२५च्या फेरपरीक्षेचं ॲडमिट कार्ड १४ जूनपर्यंत जारी केलं जाईल. तसंच विद्यार्थ्यांना १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाणार असल्याची माहिती धर्मेंद्र प्रधान यांनी दिली.

# मुलाला डॉक्टर बनवण्यासाठीच फोडला 'नीट'चा पेपर? मोटेगावकरच्या घरात सापडली प्रश्नपत्रिका.



पुणे( प्रतिनिधी ) -बहुचर्चित नीट पेपर फुटी प्रकरणात दररोज नवनवीन धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या आरसीसी कोचिंग क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केल्यानंतर न्यायालयाने त्याला सीबीआय कोठडी सुनावलीयं. दोन दिवसांच्या तपासात सीबीआयला नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणात शिवराज मोटेगावकरविरोधात अनेक पुरावे आढळून आले आहेत. शिवराज मोटेगावकर याचा मुलगा 12 वीला होता. त्यानेही नीटची परीक्षा दिलीयं. अशातच मोटेगावकरच्या घराची झाडा-झडती घेतल्यास सीबीआयला नीटची मूळ प्रश्नपत्रिकाच हाती लागल्याचं आहे. त्यामुळे आता शिवराज मोटेगावकरने मुलाला डॉक्टर बनवण्यासाठीच ही प्रश्नपत्रिका फोडल्याचा सीबीआयला संशय आहे.

शिवराज मोटेगावकर यानेच स्वतःचं वजन वापरत आपल्या कोचिंग क्लासेसमधील प्राध्यपक पी.व्ही. कुलकर्णी याची नीट परीक्षा प्रश्नपत्रिकेच्या पॅनेलवर नियुक्ती करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यानंतर कुलकर्णी याने ही गोपनीय प्रश्नपत्रिका मोटेगावकरला पुरवल्याचा दाट संशय आहे. दरम्यान, नीट पेपर फुटी प्रकरणात आत्तापर्यंत अनेकांना अटक करण्यात आली असून शिवराज मोटेगावकर याला विशेष न्यायालयाने 9 दिवसांची सीबीआय कोठडी सुनावलीयं. या 9 दिवसांच्या चौकशीतून अनेक नवीन खुलासे बाहेर येतील, अशी शक्यता आहे.

सीबीआयने केलेल्या तपासात आरसीसी कोचिंग क्लासचा संचालक शिवराज मोटेगावकरच झोलकर निघाल्याचं निष्पन्न झालंय. आपल्या कोचिंग क्लासचे प्राध्यापक पी.व्ही कुलकर्णी याची प्रश्नपत्रिका पॅनेलवर नियुक्ती ते विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचवणे, हा संपूर्ण सुनियोजित कटच असल्याचं आत्तापर्यंतच्या तपासात समोर आलं आहे. या संपूर्ण कटामध्ये शिवराज मोटेगावकर, पी.व्ही. कुलकर्णी, मनिषा मांढरे आणि मनिषा वाघमारे हेच मुख्य सुत्रधार असल्याची माहिती समोर आलीयं. त्यामुळे संपूर्ण देशभरात एकच खळबळ उडालीयं.नीट परीक्षा फुटी प्रकरणी सीबीआयने आरसीसी कोचिंग क्लासचे प्राध्यपक पी.व्ही कुलकर्णी आणि मॉर्डन कॉलेजच्या प्राध्यापिका मनिषा मांढरे हिला अटक केल्यानंतर आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकरांचं नाव समोर आलं. त्यानंतर सीबीआयने सुरुवातीला मोटेगावकरची लातूरला जात साधी चौकशी केली. चौकशी केल्यानंतर मोटेगावकरचा मोबाईल फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आला. यामध्ये डिलिट केलेला डेटा रिकव्हर केल्यानंतर मोबाईलमधील प्रश्न आणि नीट परीक्षेतील प्रश्न अगदी तंतोतंत जुळले. त्यानंतर मोबाईल घेण्यासाठी मोटेगावकरला पुण्याला बोलवले. मोटेगावर आपल्या ड्राईव्हरसोबत सीबीआयच्या पुण्यातील कार्यालयात आला असता, सीबीआयने त्याला अटक केलीयं. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दिल्लीला रवाना केलं.

# बारावी, आयटीआय, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना 11 महिने नोकरीपूर्व प्रशिक्षण....

## (दरमहा मिळतील ६,००० ते १०,००० रुपये)

ठाणे (प्रतिनिधी) - आता इयत्ता बारावीसह पदवी, पदव्युत्तर पदवी आणि डिप्लोमाच्या सर्वच विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. या विद्यार्थ्यांना शासनाच्या'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'तून ११ महिन्यांचे नोकरीपूर्व प्रशिक्षण घेता येणार आहे. या काळात बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार, आयटीआय, डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना आठ हजार आणि पदवीधर, पदव्युत्तर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना दहा हजार रुपयांचे विद्यावेतनही मिळणार आहे.

खासगी उद्योग किंवा आस्थापनांमध्ये नोकरीसाठी अर्ज केल्यानंतर त्या ठिकाणी तरुण-तरुणींना पहिल्यांदा'कामाचा अनुभव किती?' असाच प्रश्न विचारला जातो. त्यावेळी अनेकदा अनुभव नसल्याने त्यांना नोकरी मिळत नाही किंवा अपेक्षित पगार मिळत नाही. या पार्श्वभूमीवर अशा तरुणांसाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. सुरुवातीला शासकीय-निमशासकीय कार्यालयांसह खासगी आस्थापना, उद्योग, बॅंकांमध्ये या तरुणांना नोकरीपूर्व प्रशिक्षणाची संधी मिळत होती. पण सुरुवातीलाच काही तरुण-तरुणींनी ज्या ठिकाणी त्यांनी नोकरीपूर्व प्रशिक्षण घेतले, त्या शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये कायम

**३१ जुलैपूर्वी १५ हजार शिक्षकांची भरती**

# भरतीत खासगी शिक्षण संस्थेच्या हाती अवघे १० गुण, ९० गुण उमेदवाराचे 'टीईटी'चे गुण अन् पात्रतेला.....



मुंबई ( प्रतिनिधी ) - खासगी शिक्षण संस्थांमध्ये आता मनमानी पद्धतीने शिक्षक भरता येणार नाहीत. १०० गुणांपैकी सर्वाधिक गुण मिळालेल्या उमेदवाराचीच निवड करावी लागणार आहे. तत्पूर्वी, गुणवत्ता यादीनुसार पवित्र पोर्टलवरूनच एका पदासाठी तीन उमेदवार शाळेत मुलाखतीसाठी पाठविले जातील. संस्थेने त्यांच्या मुलाखती घ्यायच्या आहेत. १०० पैकी अवघे १० गुण संस्थेच्या हाती असणार आहेत. त्यातील पाच गुण उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व व संभाषण कौशल्यास तर पाच गुण अध्यापन कौशल्यासाठी आहेत. तिन्ही उमेदवारांच्या मुलाखतीचे रेकॉर्ड त्या संस्थेला जतन करुन ठेवावे लागणार आहेत. कोणी तक्रार केल्यास शिक्षणाधिकारी रेकॉर्ड पाहून निर्णय घेतील, अशी नवी नियमावली आहे. सोलापूरसह राज्यातील खासगी शिक्षण संस्था व जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सुमारे १५ हजार शिक्षकांची भरती होणार आहे. त्यातील अंदाजे सात हजार शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळांमधील आहेत. सध्या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनानंतर रिक्त राहिलेल्या पदांच्या जाहिराती ३१ मेपर्यंत पवित्र पोर्टलवर अपलोड करायच्या आहेत. त्यानंतर ज्या 'टीईटी' उत्तीर्ण उमेदवारांनी यापूर्वीच पवित्र पोर्टलवर नोंदणी केली, त्यांना प्राधान्यक्रम भरण्यासाठी आठ दिवसांची मुदत दिली जाणार आहे. खासगी संस्थांमधील शिक्षक भरतीसाठी इच्छुक उमेदवारांना ५० संस्थांचा प्राधान्यक्रम भरता येणार आहे. तर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदभरतीसाठी १०० शाळांचा प्राधान्यक्रम निवडण्याची संधी मिळणार आहे. त्यानंतर कागदपत्रांची पडताळणी होऊन गुणवत्ता याद्या प्रसिद्ध होतील. नेहमीप्रमाणे एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के पदभरती होणार आहे. या भरतीतून सोलापूर जिल्हा परिषदेसह जिल्ह्यातील खासगी अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये ३०० शिक्षकांची भरती होईल, असे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले. ३१ जुलैपूर्वी पूर्ण होईल शिक्षक भरतीची प्रक्रिया.... खासगी अनुदानित शिक्षण संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक भरतीसाठी सध्या रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड करणे सुरु आहे. ३१ मेपर्यंत त्यासाठी मुदत दिली आहे. त्यानंतर पुढील १५-२० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थामधील रिक्त पदांसाठी गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर जुलैअखेर खासगी संस्थांमधील शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण होईल. शिक्षक भरतीसंदर्भातील ठळक बाबी...स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक भरतीसाठी उमेदवारांना मुलाखतीची अट नाही. ह्यटीईटी'चे गुण, व्यावसायिक व शैक्षणिक अर्हतेच्या गुणांवरुन त्यांच्या निवडी होतील. खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक पदासाठी १०० गुणांमधून सर्वाधिक गुण मिळालेल्या उमेदवारांचीच निवड होईल. त्यात संस्थेकडून मुलाखतीस १० गुण दिले जातील.



करण्याची मागणी करत आंदोलने केली. शासनाने आता सरकारी कार्यालयांमधील नोकरीपूर्व प्रशिक्षण बंद केले आहे. आता या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार खासगी उद्योगांमध्येच ११ महिन्यांचे नोकरीपूर्व प्रशिक्षण घेता येणार आहे. त्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना योजनेच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. त्यानंतर त्यांना प्रशिक्षणाची संधी मिळेल आणि त्या काळात त्यांना दरमहा विद्यावेतनही मिळणार आहे.

नोकरीपूर्व प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरु....

जिल्ह्यातील १५० विद्यार्थ्यांना यंदा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून नोकरीपूर्व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. ज्या उद्योगांमधील कामगारांची संख्या २० पेक्षा जास्त आहे आणि जे'ई-पीएफ' भरतात, अशा उद्योगांना आम्ही भेटी देत आहोत. योजनेच्या पोर्टलवर नोंदणी केलेल्या तरुणांना त्या उद्योगांच्या ठिकाणी नोकरीपूर्व प्रशिक्षणासाठी पाठविले जात आहे.

असा करा'या' संकेतस्थळावर अर्ज....

इयत्ता बारावी, आयटीआय, पदविका (डिप्लोमा) किंवा पदवीधर, पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरीपूर्व प्रशिक्षणासाठी rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. त्यासाठी आधारकार्ड क्रमांक आणि ई-मेल आयडी लागतो. स्वतःचे नाव, मोबाईल क्रमांक टाकून अर्ज सबमिट केल्यानंतर ओटीपी येतो. त्यानंतर लक्षात राहील असा पासवर्ड टाकून नोंदणी करावी. नोंदणीनंतर काही दिवसांनी मेसेज येतो किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात जाऊनही चौकशी करता येते. कार्यालयाकडून शैक्षणिक पात्रतेनुसार खासगी उद्योगांमध्ये नोकरीपूर्व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते.

### मुलींना व्यावसायिक उच्चशिक्षण मोफत नाहीच!

# प्रवेशानंतर भरावे लागते १५ ते २५ हजारांचे डेव्हलपमेंट शुल्क; सरकारकडून मिळते शिक्षण अन् परीक्षा शुल्क.....



मुंबई ( प्रतिनिधी ) - राज्यातील अभियांत्रिकी, फार्मसीसह सर्व व्यावसायिक शिक्षण मुलींना मोफत मिळते. राज्य सरकारकडून मुलींचे शिक्षण व परीक्षा शुल्क भरले जाते. मात्र, खासगी व शासकीय महाविद्यालयांकडून डेव्हलपमेंट शुल्क (विकास शुल्क) घेतले जाते. प्रत्येक महाविद्यालयांचे विकास शुल्क वेगवेगळे आहे, तरीपण सरासरी १५ ते २५ हजार रुपयांचे विकास शुल्क दरवर्षी मुलींना द्यावे लागत आहे. तेवढे शुल्क भरणे शक्य नसलेल्या मुलींना दुसऱ्या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा लागत आहे.

मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय झाल्यापासून राज्यात व्यावसायिक शिक्षणात विशेषतः अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मुलींचा टक्का वाढला आहे. दरम्यान, खासगी महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क लाखात असते आणि विकास शुल्क २५ हजारांपर्यंत असते. याउलट शासकीय उच्च महाविद्यालयांची शिक्षण शुल्क कमी आणि विकास शुल्क खूप जास्त आहे. शासकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाल्याचा विद्यार्थ्यांना आनंद असतो, पण विकास शुल्क भरताना त्यांची पंचाईत होते. अनेकांना वेळेत विकास शुल्क भरणे शक्य नसल्याने प्रवेश रद्द देखील करावा लागतो. या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकार विकास शुल्क देखील भरण्याच्या तयारीत आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच त्यासंदर्भात भाष्य केले आहे.

महाविद्यालयांच्या शुल्कवाढीवर आता नियंत्रण....

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या माध्यमातून शासकीय विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे शुल्क निश्चित होते. मात्र, प्राधिकरणाच्या कक्षेबाहेरील खासगी विद्यापीठ व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांसाठी प्राधिकरणाचे निकष लागू नाहीत. त्यामुळे तेथे मनमानी पद्धतीने शुल्क वाढ होते. त्यामुळे आता अशी सर्व महाविद्यालये प्राधिकरणाच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पाऊल टाकले आहे. त्यावर अभ्यास सुरु असल्याचे वरिष्ठ, अधिकाऱ्यांनी सांगितले.

महाविद्यालयांच्या शुल्कवाढीवर आता नियंत्रण....

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या माध्यमातून शासकीय विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे शुल्क निश्चित होते. मात्र, प्राधिकरणाच्या कक्षेबाहेरील खासगी विद्यापीठ व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांसाठी प्राधिकरणाचे निकष लागू नाहीत. त्यामुळे तेथे मनमानी पद्धतीने शुल्क वाढ होते. त्यामुळे आता अशी सर्व महाविद्यालये प्राधिकरणाच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पाऊल टाकले आहे. त्यावर अभ्यास सुरु असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

तर व्यावसायिक शिक्षणात मुलींचा टक्का आणखी वाढेल....

राज्य शासनाने राज्यातील मुलींना व्यावसायिक उच्चशिक्षण मोफत केले आहे. त्यामुळे अभियांत्रिकीसह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना मुलींचे प्रवेश वाढले आहेत. शासनाकडून मुलींना सध्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मिळते. आता विकास शुल्क देखील शासनाकडून मिळणार असेल तर व्यावसायिक शिक्षणाकडे मुलींचा कल आणखी वाढणार आहे

# एज्युकेशन जॉब्स -शिक्षण चिंतन : व्यावसायिक शिक्षणातून जीवन शिक्षण....

डॉ. मिलिंद नाईक प्राचार्य, ज्ञानप्रबोधिनी प्रशाला

मुंबई ( प्रतिनिधी ) - राष्ट्रीय शिक्षण धोरणावर आधारित व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमात व्यवसायांचे तीन महत्त्वाचे प्रकार सांगितले आहेत, सजीव सृष्टीशी संबंधित, यंत्रे व सामुग्रीशी संबंधित आणि मानवी सेवांशी संबंधित कार्ये. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कामाची प्रतिष्ठा, तांत्रिक कौशल्ये आणि विविध जीवनोपयोगी क्षमता विकसित होणे, हे अपेक्षित आहे.नवीन अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना वर्गात बसून केवळ पुस्तकी ज्ञान दिले जाणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी दिली जाईल. विद्यार्थ्यांना शेतात काम करणे, यंत्रे हाताळणे, सुतारकाम, धातुकाम, शिवणकाम, शेती, पशुपालन, अन्नप्रक्रिया, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स आणि विविध तंत्रज्ञानाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी केले जाईल. त्यामुळे शिक्षण हे प्रत्यक्ष अनुभवाशी जोडले जाईल आणि अधिक जीवनोपयोगी होईल. मात्र पारंपरिक व्यवसाय शिक्षणापेक्षा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील व्यवसाय शिक्षण ही संकल्पना वेगळी आहे. एखादा विशिष्ट व्यवसाय प्रकार घेऊन त्यातील कौशल्य विकसन असे इथे अपेक्षित नसून विविध व्यवसायांमध्ये आवश्यक असणाऱ्या मूलभूत क्षमता आणि जीवनकौशल्ये विकसित करणे हा त्याचा हेतू आहे. पुढे दिलेल्या 'परसबाग' प्रकल्पाच्या उदाहरणावरून हे वेगळेपण लक्षात येईल.विद्यार्थ्यांनी 'परसबागेत भाजीपाला तयार करणे' हा प्रकल्प हाती घेतला आहे. अभ्यासक्रमातील अपेक्षेनुसार हा प्रकल्प म्हणजे केवळ बियाणे पेरणे आणि झाडे वाढविणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर ती एक छोटी प्रयोगशाळाच होणं अपेक्षित आहे. विद्यार्थी एकाच प्रकारच्या भाज्यांची वेगवेगळ्या पद्धतीने लागवड करू शकतात. एका वाफ्यात सेंद्रिय खत तर दुसऱ्या वाफ्यात रासायनिक खत वापरून वाढीतील फरक अभ्यासू शकतात. कमी व जास्त पाण्यामुळे उत्पादनावर होणारा परिणाम, सूर्यप्रकाश व सावलीतील वाढीतील फरक किंवा विविध बियाणांच्या जातींची तुलना असे अनेक प्रयोग 'परसबाग' प्रकल्पात विद्यार्थी करू शकतील, नव्हे त्यांनी ते करावेतच अशीच अपेक्षा आहे. अशा प्रयोगांमधून विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, संशोधन वृत्ती, नोंदी ठेवणे, निष्कर्ष काढणे आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होईल. त्याचबरोबर जीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित आणि वैज्ञानिक पद्धतीचे ज्ञानही प्रत्यक्ष अनुभवातून मिळेल.'परसबाग' प्रकल्पामुळे मिळणारे शिक्षण इथेच थांबत नाही. तयार झालेला भाजीपाल्यावरचा खर्च काढणे, विक्री किंमत निश्चित करणे, नफा-तोट्याचा अभ्यास, ग्राहकांशी संवाद आणि विक्री व्यवस्थापन यांचेही शिक्षण मिळणार आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार न करता उद्योजकतेसाठीही सक्षम केले जाईल. एखादी वस्तू तयार करणे, तिची किंमत ठरवणे, विक्रीचे नियोजन करणे आणि व्यवसाय प्रक्रिया समजून घेणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढणे आणि रोजगारनिर्मितीची दृष्टी विकसित होणे अपेक्षित आहे.

# नागपुरात सीबीआयकडून तीन विद्यार्थ्यांची चौकशी;पुण्यात मोटेगावकरच्या मुलाचीही चौकशी.....




नागपूर ( प्रतिनिधी ) - देशभर गाजत असलेल्या नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला वेग आला असून, केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे धाडसत्र राबविले. पुणे येथील पेपरफुटी रॅकेटशी संबंध असल्याच्या संशयावरून तीन विद्यार्थ्यांच्या घरांची झडती घेण्यात आली. या कारवाईमुळे विदर्भातील नीटची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सीबीआयच्या पथकाने नागपुरातील सेंट्रल अव्हेन्यू व इतवारी परिसरातील दोन ठिकाणी, तर चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील एका घरावर छापे टाकले. संबंधित तिन्ही विद्यार्थी यंदाच्या नीट परीक्षेला बसले होते. तपासादरम्यान त्यांचा संबंध पुण्यातील कथित पेपरफुटी साखळीशी आल्याचे समोर आले आहे.

झडतीदरम्यान मोबाईल फोन, लॅपटॉप, हस्तलिखित नोट्स तसेच इतर डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. या साहित्याची फॉरेन्सिक तपासणी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. संबंधित विद्यार्थी 'रीपीटर' असून विविध कोचिंग क्लासेसमधून तयारी करत होते. त्यांचे पुण्यातील रॅकेटशी थेट संपर्क असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.

विद्यार्थ्यांचीही 'नीट' झाडाझडती

प्रत्येक उमेदवाराकडून सुमारे १५ लाख रुपये घेऊन प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. अटकेतील पुण्यातील ब्युटी पार्लर संचालिका मनीषा वाघमारे ही विद्यार्थी व पालकांना रॅकेटशी जोडणारी मध्यस्थ असल्याचा संशय आहे. तिच्यामार्फत विद्यार्थ्यांचा संपर्क पुण्यातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी आला होता.

कुलकर्णींच्या निवासस्थानी खास सत्र.....

कुलकर्णी हे या प्रकरणातील प्रमुख आरोपी मानले जात असून, ते राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) प्रक्रियेशी संबंधित असल्याचा संशय आहे. परीक्षेपूर्वी काही विद्यार्थ्यांना पुण्यात बोलावून कुलकर्णी यांच्या निवासस्थानी खास सत्र घेण्यात आल्याची माहिती सीबीआयने दिली आहे. या सत्रात विद्यार्थ्यांना संभाव्य प्रश्न, पर्याय आणि महत्त्वाचे मुद्दे वहीत लिहून घेण्यास सांगण्यात आले होते. यातील अनेक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत आल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.

लाभार्थ्यांचा शोध सुरू

व्हॉट्सॲप ग्रुप, कोचिंग क्लासेसचे संपर्क, कुरिअर आणि रोख व्यवहारांच्या माध्यमातून हे रॅकेट अनेक राज्यांमध्ये कार्यरत होते, असेही तपासात स्पष्ट होत आहे. अद्याप संबंधित विद्यार्थ्यांना अटक झाली नसली तरी त्यांची नेमकी भूमिका तपासली जात आहे. सीबीआय आता बँक व्यवहार, कॉल रेकॉर्ड आणि डिजिटल पुरावे तपासून या रॅकेटमधील इतर लाभार्थ्यांचा शोध घेत आहे.

### आलिशान क्लास. भपकेबाज जाहिरात.

# कोचिंगच्या नावाखाली मोठा गोरखधंदा. डोळे फिरवेल कमाईची आकडेवारी...




मुंबई ( प्रतिनिधी ) - नीट पेपरफुटीचे महाराष्ट्र कनेक्शन समोर आल्यापासून शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या महापापामध्ये महाराष्ट्रातील बडी शिक्षकी धेंडांचा सहभाग चिंताजनक आहे. शिक्षण क्षेत्रातील या नराधमांनी लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला आहे. त्यांना कडक शिक्षा देण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे. तर गेल्या काही वर्षामध्ये सुवर्ण भविष्याचे स्वप्न दाखवत कोचिंग क्लासेसचे दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत पेव फुटले आहे. विद्यार्थी आणि पालकांच्या भरवशावर त्यांची कोट्यवधींची कमाई सुरू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात गल्लेभरू स्पर्धा उभी ठाकल्याने क्लास संचालकांचे खिसे मात्र गरम होत आहे. त्यांची कोट्यवधींची कमाई होत आहे.

कोचिंगचा व्यवसाय २० हजार कोटींच्या पुढे...

देशातील खासगी शिकवणी वर्गांचा व्यवसाय २० हजार कोटींच्या पुढे पोहचला आहे. जेईई-नीटसह स्पर्धा परीक्षांमुळे कोचिंग इंडस्ट्रीचा झपाट्याने विस्तार झाला आहे. दिल्ली, कोटा, पुणे, नागपूरसह अनेक मोठ्या शहरांत कोचिंगचे जाळे विस्तारले आहे. आता छोट्या शहरांमध्येही शाखा विस्तारावर भर असल्याने सगळीकडेच कोचिंगचे फॅड वाढले आहे. जेईई, नीट, यूपीएससी, एमपीएससीसाठी विशेष प्रशिक्षण देणाऱ्या संस्था वाढल्या लाखो विद्यार्थ्यांमुळे कोचिंग व्यवसाय तेजीत आहे.

हे गणित टाकणार चक्रावून-वैद्यकीय शिक्षणाच्या एक लाख जागांसाठी २० ते २२ लाख विद्यार्थी स्पर्धेत, यातील तब्बल ९० टक्के विद्यार्थी शिकवणी वर्गांवर अवलंबून आहेत. आयआयटी-एनआयटीच्या मर्यादित जागांमुळे स्पर्धा तीव्र आहे. नामांकित क्लासेसकडून आयआयटी-नीट प्रवेशाची'१०० टक्के हमी' देतात. त्यामुळे पालक आणि विद्यार्थी मोठ्या फीच्या आमिषाला बळी पडतात. दोन वर्षांसाठी २ ते ३ लाख रुपयांपर्यंत फी आकारली जाते.एका कोचिंग संस्थेत तब्बल २५ हजारांपर्यंत विद्यार्थ्यांचे प्रवेश एका क्लासचा वार्षिक व्यवसाय २५० कोटींच्या घरात जातो. मोठ्या निकालाच्या दबावामुळे पेपरफुटीचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed,Published And Owned By.Dr.Rajkumar M.kolhe Printed At Jagruti Printg Press,b-101,byculla Service Industrial Estate,D.K.Cross Road, Byculla,Mumbai-400027,andPublished From 501,Gopi Cine Mall Residence,NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.- 421202
Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe,Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042